# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया

## कायदेशीर मदत संरक्षण बचाव सल्लागार प्रणाली, गोंदिया

### कार्यालयीन सहाय्यक व रिसेप्शनिस्ट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर तसेच शिपाई या पदांकरीता पात्र उमेदवारांसाठी सुचना

### सुचना

१. जिल्हा न्यायालयाच्या वेबसाईट वर कार्यालयीन सहाय्यक व रिसेप्शनिस्ट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदांकरीता मराठी व इंग्रजी टंकलेखन चाचणीकरीता पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येत असून त्या व्यतिरिक्त कोणतेही पत्र उमेदवारास पाठविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

२. कार्यालयीन सहाय्यक व रिसेप्शनिस्ट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदांकरीता पात्र उमेदवारांची दिनांक २६/०७/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मल्टीपरपज हॉल, ५वा मजला, जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया येथे मराठी व इंग्रजी टंकलेखन चाचणी घेण्यात येणार आहे. सदर दोन्ही टंकलेखन चाचणी परिक्षेचा निकाल/यादी दिनांक २८/०७/२०२५ रोजी जिल्हा न्यायालय, गोंदिया यांच्या संकेतस्थळांवर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, गोंदिया येथील सुचना फलकावर जाहीर/प्रसिध्द करण्यात येईल.

३. मराठी व इंग्रजी टंकलेखन पात्र उमेदवारांनी सदर चाचणीच्या एक तास पूर्वी हजर राहणे आवश्यक आहे. उशिरा आलेल्या उमेदवारांना परिक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही, याबाबत पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४. वरील पात्र उमेदवारांची संगणकावर प्रत्येकी १० मिनिटात मराठी टंकलेखन (३० श.प्र.मी) **"Kruti Dev 055"** व इंग्रजी टंकलेखन (४० श.प्र.मी) **"Bitstream Charter"** या फॉन्ट वर चाचणी घेण्यात येणार आहे. सदर दोन्ही टंकलेखन चाचणीस पात्र असलेल्या उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल.

५. पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक ३०/०७/२०२५ रोजी सकाळी ९.०० ते ११.०० व सायंकाळी ०५.४५ ते ७.४५ पर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, गोंदिया यांचे निजी दालन, पहिला मजला, जिल्हा व सत्र न्यायालय, गोंदिया येथे होईल व त्यांचा निकाल त्याचदिवशी जिल्हा न्यायालय, गोंदिया यांच्या संकेतस्थळांवर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, गोंदिया येथील सुचना फलकावर जाहीर/प्रसिध्द करण्यात येईल.

६. शिपाई या पदाची भरतीप्रक्रिया प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली आहे. याची संबंधीत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(नरेश केशवराव वाळके)
सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
तथा दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर, गोंदिया

दिनांक :—१९/०७/२०२५
ठिकाण :— गोंदिया